झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.
(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाइट: www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# आदेश

झोपुप्रा/तह-ताबा/६१४/२०२४
दिनांक:- ०७/०८/२०२४

विषय :- स.नं.४४/१, पै. सि.स.नं. ५२०, राजीव गांधी पार्क,एरंडवणा,पुणे या योजनेतील संक्रमण शिबिर म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ए-१३ इमारतीतील निवास करत असलेल्या पात्र ५२ झोपडीधारकांसाठी पुनर्वसन सदनिका म्हणून वापर नियमित केल्याने तेथील सदनिकांबाबत करारनामा निष्पादित करुन नोंदवणे बाबतचा आदेश.

संदर्भ :-
१. विकसक मे. कुमार सिन्यु डेव्हलपर्स यांचे आ.क्र. १९३७, दि. २४/०८/२०२३ रोजीचे पत्र.
२. या विभागाकडील जा.क्र. झोपुप्रा/तह-ताबा/१६५/२०२४, दि. ११/०३/२०२४ रोजीचे पत्र.
३. गृहनिर्माण विभाग महाराष्ट्र शासन पत्र- झोपुप्रा- २०२४/प्र.क्र.७५/झोपसु, दि.१२/०६/२०२४.
४. झोपुप्रा कार्यालयाकडील जा.क्र. झोपुप्रा/तांत्रिक/ १८३९/२०२४, दि. २९/०७/२०२४ रोजीचा आदेश.
५. ए-१३ निर्वाणा विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (एस.आर.ए.) यांचे आ.क्र.एम-२८४४, दि. ३१/०७/२०२४ रोजीचे पत्र.

संदर्भ क्र. १ नुसार दिनांक २४/०८/२०२३ रोजी स.नं. ४४/१, राजीव गांधी पार्क, एरंडवणा, पुणे या मिळकतीवर ए- १३ या संक्रमण शिबिर म्हणून मान्यता मिळालेल्या इमारतीमध्ये पात्र झोपडीधारकांना स्थलांतरीत करण्यात आले होते. ए-१३ इमारतीतील पात्र झोपडीधारकांनी त्यांना स्थलांतरीत केलेल्या जागेवरच म्हणजेच ए-१३ इमारतीमध्येच कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे, तसेच ए-१३ इमारतीत निवास करत असणाऱ्या पात्र झोपडीधारकांनी त्यांची सदनिका कायमस्वरुपी करुन करारनामा करण्याकरीता सदनिका क्रमांक नमुद करुन प्रतिज्ञापत्रे या कार्यालयाकडे सादर केले आहेत. झोपडीधारकांसोबत करारनामे करण्यास परवानगी मिळण्याची विनंती विकसक मे. कुमार सिन्यु डेव्हलपर्स यांनी केली आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार झोपुप्राच्या, नगररचना शाखेकडे दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये उक्त विकसक मे. कुमार डेव्हलपर्स यांनी विनंती केली असून ए-१३ इमारतीतील

पात्र झोपडीधारकांनी सदनिका क्रमांक नमुद करुन प्रतिज्ञापत्र सादर केले असल्याची सविस्तर तपशिलवार माहीती सादर करण्यात आली आहे.

३. विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ट्रान्झिट कॅम्प म्हणून अभिलेखित केलेली इमारत क्र. ए-१३, झोपडपट्टी पुर्नवसन योजनेतील पुनर्वसन घटक म्हणून नियमित करण्याबाबतची धारणा पक्की करण्यासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे दिनांक ०२/०५/२०२४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अहवाल सादर केला असता, प्रस्तावातील नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहून धारणा पक्की करण्यात येत आहे असे शासनाने या कार्यालयास संदर्भ क्र. ३ अन्वये कळविले आहे.

४. शासनाच्या मान्यतेनुसार संदर्भ क्र. ४ अन्वये दिनांक २९/०७/२०२४ रोजी झोपुप्रा कार्यालयाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ट्रान्झिट कॅम्प इमारत क्र. ए-१३ पुनर्वसन घटक म्हणून नियमित करणेबाबतचा आदेश पारित करण्यात आला आहे. सदर ए-१३ इमारतीमध्ये एकुण ५९ निवासी सदनिका असून त्या पुनर्वसन घटक म्हणून मंजूर करण्यात येत आहेत. यासंदर्भात विकसकाने सादर केलेली हमीपत्रे व दि. २९/०७/२०२४ च्या आदेशातील सर्व शर्ती - अटी लागू राहतील.

५. स.नं. ४४/१ पै सि.स.नं.५२०, राजीव गांधी पार्क, एरंडवणा, पौड रोड,पुणे या योजनेतील ए-१३ या इमारतीमध्ये निवास करत असलेल्या पात्र निवासी झोपडीधारकांची ए-१३ निर्वाणा विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (एस.आर.ए.) या नावाने दिनांक १२/०१/२०२४ रोजी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी केली आहे व सदर प्रकरणी ठराव क्र. ०१ दि. ३१/०७/२०२४ नुसार संक्रमण व्यवस्थेला पुनर्वसन घटक म्हणून घोषीत करण्यास संमती दिली आहे.

६. ए-१३ निर्वाणा विहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (एस.आर.ए.) यांनी संदर्भ क्र. ५ नुसार ए-१३ इमारतीतील सभासदांनी / सदनिका धारकांनी सदनिका क्रमांक नमुद करुन प्रतिज्ञापत्र सादर केले असून संक्रमण शिबिर म्हणून निवास करत असलेली त्यांची सदनिका पुनर्वसन घटक म्हणुन कायमस्वरुपी रुपांतरीत करुन सदनिका त्यांच्या नावे करण्याची विनंती या कार्यालयाकडे केली आहे.

७. ए-१३ इमारतीत निवास करत असलेल्या ५२ पात्र निवासी झोपडीधारकांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार व ए-१३ या इमारतीस पुनर्वसन घटक म्हणून नियमित करणेबाबतच्या झोपुप्राच्या दि. २९/०७/२०२४ रोजीच्या आदेशानुसार ट्रान्झिट कॅम्पमधील जुना सदनिकेचा क्रमांक व पुनर्वसन घटक म्हणून मान्यता दिलेल्या मंजुर नकाशामध्ये सदनिकेचे क्रमांक बदल झाले असून नवीन क्रमांकाचा विचार करण्यात येत आहे. विकसक मे. कुमार सिन्यु डेव्हलपर्स यांनी दि. ३१/०७/२०२४ रोजी वरील बदलाप्रमाणे करारनामे करणेबाबत कळविले आहे.

८.ए-१३ या पुनर्वसन इमारतीतील करारनामा करण्यात येणाऱ्या ५२ पात्र निवासी झोपडीधारकांचा सदनिका क्रमांकासह तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | झोपडी क्रमांक. | झोपडीधारकाचे नाव | झोपडीधारकाच्या पती/पत्नीचे नाव. | निवास करत असलेला सदनिका क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | ८०२ | सुरेश विश्वनाथ कुचेकर | रेखा | १०१ |
| २ | ११८७ | सरोदे विठ्ठल दशरथ | सखुबाई | १०२ |
| ३ | - | खान मस्तान महंमद | - | १०३ |
| ४ | १२०२/१ | चौधरी फुलाबाई विठ्ठल | विठ्ठल | १०४ |
| ५ | बी-१७४७/४ | उमेश बंडू शिंदे | - | १०७ |
| ६ | ८६४ | यशवंत नारायण शिंदे | पार्वती | १०८ |
| ७ | ७६१ | चव्हाण शिवाजी मारुती | - | १११ |
| ८ | १२०७/१ | राजू दामोदर ओझरकर | अश्विनी राजू ओझरकर | ११२ |
| ९ | - | शिर्के ज्योती हरीभाऊ | - | २०१ |
| १० | बी- १७५९ | गेणू भिकू साठे | मंदा गेणू साठे | २०२ |
| ११ | बी-१७५० | साजिदा बेगम मुलाणी | - | २०३ |
| १२ | - | महादेव नथु कुंभार | - | २०४ |
| १३ | ११८७/१ | आशा संदीप कदम | - | २०८ |
| १४ | ११९८ | जैन सावित्री श्रीकांत | श्रीकांत | २०९ |
| १५ | ११८८ | पार्वती गोपाळ माने | गोपाळ | २१० |
| १६ | - | मंदा केशव जगताप | - | २११ |
| १७ | - | अरविंद तुकाराम घेवडे | - | २१२ |
| १८ | बी- १३०६/५ | रोहिदास शंकर येनपुरे | - | ३०१ |
| १९ | बी- १७५१ | रामभाऊ शंकर फाले | संगिता रामभाऊ फाले | ३०२ |
| २० | बी- १७४९ | नारायण बापू कोतवाल | कमल नारायण कोतवाल | ३०३ |
| २१ | बी- १३०६/६ | रमेश रामभाऊ रांधवन | रेखा रमेश रांधवन | ३०४ |
| २२ | बी- १७४८ | गणेश बंडू शिंदे | - | ३०५ |
| २३ | ११९५ | अब्दुल दस्तगीर शेख | मालन अब्दुल शेख | ३०६ |
| २४ | बी-१४४८/१ | नंदू गणपत नढे | मंदा नंदु नढे | ३०७ |
| २५ | बी- १७४७ | जिजाबाई तुकाराम वाळुंज | - | ३०८ |
| २६ | १०२३ | अमराळे विनायक चंद्रकांत | सुमन | ३०९ |
| २७ | १२०० | पठाण जिलानी अमिर | - | ३१० |
| २८ | ११९३ | शंकर विठ्ठल वाशिवाले | मंगल | ३११ |

| अ. क्र. | झोपडी क्रमांक. | झोपडीधारकाचे नाव | झोपडीधारकाच्या पती/पत्नीचे नाव. | निवास करत असलेला सदनिका क्र. |
|---|---|---|---|---|
| २९ | १२०२ | चौधरी कचरु विठोबा | लिला | ३१२ |
| ३० | बी- १७६५ | मारुती भैरु वर्वे | अनिता मारुती वर्वे | ४०१ |
| ३१ | बी- १७४७/६ | निलेश सुरेश बेचावडे | निलिमा निलेश बेचावडे | ४०२ |
| ३२ | १२०७ | ओझरकर अंकुश दामोदर | साधना अंकुश ओझरकर | ४०३ |
| ३३ | बी-१७४७/३ | दिनेश माणिक सातव | - | ४०४ |
| ३४ | बी- १३०६/३ | रामदास आबूराव वर्वे | विमल रामदास वर्वे | ४०५ |
| ३५ | ११९७ | मंगेश बाळू देवळेकर | रेश्मा मंगेश देवेळेकर | ४०६ |
| ३६ | बी- १३०६/२ | मनोहर आबूराव वर्वे | सविता मनोहर वर्वे | ४०७ |
| ३७ | बी- १३०६/४ | सोपान नागू धूरकर | सुशिला सोपान ढोरकर | ४०८ |
| ३८ | ११९२ | कांबळे त्रिंबक यादव | - | ४०९ |
| ३९ | - | अरुण जयवंत ढोकळे | - | ४१० |
| ४० | १२०१ | शहाबुद्दीन अमिर पठाण | तमिजबी | ४११ |
| ४१ | बी-१७६५/१ | साहेब अप्पा पुजारी | - | ४१२ |
| ४२ | बी- १७५६ | जमिर लाला शेख | - | ५०१ |
| ४३ | बी- १७५७ | मेहबूब लाला शेख | - | ५०२ |
| ४४ | बी- १७६७ | सोमनाथ शंकर मादगे | अपर्णा सोमनाथ मादगे | ५०३ |
| ४५ | बी- १७६० | परमेश्वर रायप्पा सोनकांबळे | सरनाबाई सोनकांबळे | ५०४ |
| ४६ | - | संजय किंसन पवार | - | ५०५ |
| ४७ | ७६३ | शाम मारुती आवळे | शांताबाई | ५०६ |
| ४८ | बी-१७६६ | सलीम मशाक सय्यद | परवीन सलीम सय्यद | ५०७ |
| ४९ | बी- १७५३ | बबन किसन उजगरे | अर्चना बबन उजगरे | ५०८ |
| ५० | १२०१/१ | सय्यद शहाबुद्दीन पठाण | - | ५०९ |
| ५१ | बी-१७५९/१ | राजू गेणू साठे | राजश्री राजू साठे | ५१० |
| ५२ | ८८६ | रामचंद्र धाकू कोळेकर | संगिता रामचंद्र कोळेकर | ५१२ |

९. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ट्रान्झिट कॅम्प इमारत क्र. ए-१३ संदर्भात पुनर्वसन घटक म्हणून नियमित करणेबाबतच्या दिनांक २९/०७/२०२४ रोजीच्या आदेशाला अधिन राहून उक्त झोपडीधारकांनी त्यांची संक्रमण निवास व्यवस्था ही कायमस्वरुपी पुनर्वसन सदनिका म्हणून मान्य असण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केले असल्याने उक्त ५२ पात्र निवासी झोपडीधारकांशी त्यांच्या

नावासमोर नमुद सदनिका क्रमांकानुसार विकसकाने करारनामे करावेत असा आदेश पारित करण्यात येत आहे.

१०. सदर प्रकरणी विकसकाने योजनेबाबतची सर्व पार्श्वभूमी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि महानगरपालिका यांचेकडील सर्व आदेशांची व त्यामधील शर्ती- अटींची नोंद करारनाम्यात करावी. करारनामे नोंदणीकृत झाल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेने संबंधितांना भागधारक दाखले देण्याबाबतची कार्यवाही झो.पु.प्राधिकरणाच्या सहकार विभागाकडील मार्गदर्शनानुसार करावी. त्यानंतर विकसकाने सदर जागेच्या भाडेपट्याचे हस्तांतरण सह. गृहनिर्माण संस्थेच्या लाभात करावे.

सदर योजना विकसक मे. कुमार सिन्यु कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत राबविण्यात आलेली असलेने पात्र निवासी झोपडीधारकांसोबत करावयाचे करारनामे नोंदणीकृत करणेकामी विकसक मे. कुमार सिन्यु डेव्हलपर्स यांना झो.पु.प्रा. कार्यालयाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, सदर करारनामा नोंदणीस महाराष्ट्र महसूल व वन विभागाकडील राजपत्र मंगळवार, मार्च ४, २००८/ फाल्गुन १४, शके १९२९ मधील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क सवलत देण्यात यावी.

नीलेश र.गटणे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

प्रत:- १. दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ ते २८, पुणे यांना उक्त ५२ झोपडीधारकांचे त्यांच्या नावासमोर नमुद सदनिका क्रमांकानुसार करारनामे नोंदविणेकरीता रवाना.

२. विकसक मे. कुमार सिन्यु डेव्हलपर्स प्रा.लि., २४०९, इस्ट स्ट्रीट, पुणे-०१ यांना उक्त ५२ सदनिकाधारकांसोबत करारनामे करणेकरीता रवाना.